दिव्य मराठी

अहमदनगर सिटी 31-07-2020

जिद्द • आवड असली की, आपोआप सवड मिळते, श्रीरामपुरातील दोन अवलियांचा विक्रम

# ५३ व्या वर्षी दहावी, तर ६० व्या वर्षी बारावी पास

नवनाथ कुताळ | श्रीरामपूर

आवड असली की सवड मिळते, असं म्हणतात. आवडीला वयाचे बंधन नसते. जिद्द पूर्ण करण्यासाठी सवड काढू शकतात. असंच काहीस झालं अनिल भनगडे व कल्याणकर नाईट हायस्कूलचे शाळा समितीचे अध्यक्ष दीपक कुऱ्हाडे यांच्याबाबतीत. भनगडे यांनी वयाच्या ५३ व्या वर्षी दहावीची, तर दीपक कुऱ्हाडे यांनी ६० व्या वर्षी बारावीची परीक्षा दिली अन् ते उत्तीर्णही झाले.

लहानपणीच कौटुंबीक जबाबदारी आल्याने खांद्यावरचे दप्तर खाली ठेवावे लागले. शिक्षणाची आवड होती, मात्र शाळेत जायला सवड नव्हती. त्यामुळे भनगडे यांना सातवीत, तर कुऱ्हाडे यांना ९ वीत शाळेला



अनिल भनगडे



दीपक कुऱ्हाडे

सोडचिठ्ठी दिली. काही वर्षे रिक्षा चालवून कुटुंबाचा उदर्निवाह केला. कुऱ्हाडे यांनी मोलमजुरीची कामे केली. वय वाढत गेले, पण शिक्षणाची आवड कमी झाली नाही. २०१७ मध्ये भनगडे यांनी रात्रशाळेत सातवीला व कुऱ्हाडे यांनी नववीत प्रवेश घेतला.

दिवसा काम अन् रात्री शाळा. कुऱ्हाडे यांनी ५८ व्या वर्षी १० वीच्या परीक्षेत ६१ टक्के, तर भनगडे यांनी ४८.४० टक्के गुण मिळवले. कुऱ्हाडे यांनी शिक्षण पुढे चालू ठेवले. ११ वीला सोमय्या ज्युनियर कॉलेजमध्ये प्रवेश घेत वयाच्या ६० व्या वर्षी १२ वी कला शाखेत ५८ टक्के गुण मिळवले. अनेकांनी त्यांची चेष्टा केली. परीक्षा देण्यासाठी वर्गात जातानाही अनेक जण त्यांच्याकडे पाहून आश्चर्य व्यक्त करत. परंतु त्यांनी दुर्लक्ष करुन परिक्षा दिली आणि पास झाले आहे. कुऱ्हाडे ज्या शाळेतून वयाच्या ५८ व्या वर्षी १० वी झाले, त्याच शाळेच्या समितीचे ते अध्यक्ष आहेत. दरम्यान, या दोघांच्या या जिद्दीबद्दल त्यांचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे.

## हाच आमचा पुरस्कार

रात्रशाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कांबळे म्हणाले, ज्यांना बालवयात शिकता आलं नाही, त्यांना शिक्षण देणे हेच रात्रशाळेचे उद्दिष्ट आहे. गवंडीकाम करणारे नंदकिशोर पंडित हे ७२.२०, तर गृहिणी असलेल्या जया पवार यांनी ६५.८० टक्के मिळवले. प्रौढ विद्यार्थी यश मिळवतात हाच आमचा पुरस्कार आहे.

## आम्हाला आता वकील व्हायचंय

भनगडे व कुऱ्हाडे म्हणाले, म्हातारपणी शिकता का, असे टोमणेही मारले गेले, पण आम्ही लक्षापासून विचलित होऊ दिले नाही. तसे झाले असते, तर आमच्या शिक्षणाची गंगा मध्येच आटली असती. येथेच न थांबता आम्हाला वकील व्हायचं आहे.